दि. १६/०३/२०२६

**प्रेसनोट**

आरोपी लोकसेवक १) प्रशांत प्रकाश मुकरे, वय- ४५ वर्षे, पद- ग्रामपंचायत अधिकारी उंबरगांव ता. पंढरपूर, जि.सोलापूर, रा. ३०३ ,बी विंग, निर्मिती अपार्टमेंट, जुना कराड नाका पंढरपूर, २) श्री.दत्तात्रय अभिमान कांबळे वय-४५ वर्षे, पद- ग्रमापंचायत शिपाई रा. उंबरगांव ता. पंढरपूर, जि. सोलापूर यांनी तक्रारदार यांना पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल मंजुर झाले असुन घरकुलसाठी १,२०,०००/- रुपये मंजुर होते. सदर मंजुर घरकुल रक्कमेचा शेवटचा हप्ता देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे लोकसेवक श्री. प्रशांत प्रकाश मुकरे, व श्री. दत्तात्रय अभिमान कांबळे यांनी २०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १२,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारले म्हणून गुन्हा नोंद

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| पोलीस ठाणे/गुन्हा नोंदक्रमांक | पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण येथे गुन्हा नोंदकरण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७, ७ अ व १२ प्रमाणे. |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) प्रशांत प्रकाश मुकरे, वय- ४५ वर्षे, पद- ग्रामपंचायत अधिकारी उंबरगांव, पंचायत समिती कार्यालय पंढरपूर रा. ३०३ ,बी विंग, निर्मिती अपार्टमेंट, जुना कराड नाका पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर<br>२) श्री.दत्तात्रय अभिमान कांबळे वय-४५ वर्षे, पद- ग्रमापंचायत शिपाई रा. उंबरगांव ता. पंढरपूर, जि. सोलापूर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १२,०००/- रुपये. |
| पडताळणी दिनांक | **पडताळणी कारवाई**<br>१) दिनांक १३/०३/२०२६ रोजी, श्री. दत्तात्रय अभिमान कांबळे पद- ग्रमापंचायत शिपाई यांची<br>२) दिनांक १६/०३/२०२६ रोजी श्री. प्रशांत प्रकाश मुकरे, पद- ग्रामपंचायत अधिकारी उंबरगांव, पंचायत समिती कार्यालय पंढरपूर यांची |
| सापळा दिनांक | यशस्वी सापळा कारवाई दि. १६/०३/२०२६ रोजी |
| सापळा अधिकारी | श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर |
| तपास अधिकारी | श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल मंजुर झाले असुन घरकुलसाठी १,२०,०००/- रुपये मंजुर होते. सदर मंजुर घरकुल रक्कमेचा शेवटचा हप्ता देण्यासाठी दिनांक १३/०३/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान श्री. दत्तात्रय अभिमान कांबळे, ग्रामपंचायत शिपाई यांनी स्वतः साठी व ग्रामपंचायत अधिकारी श्री. प्रशांत प्रकाश मुकरे यांचेसाठी २०,०००/- रुपये लाचेची मागणी करून तडजोडीवरून १०,०००/- रु लाच मागणी केली. सदर वेळी ग्रामपंचायत अधिकारी श्री. प्रशांत मुकरे हे हजर नसल्याने त्यांचेवर दिनांक १६/०३/२०२६ रोजी पडताळणी कारवाई करण्यात आली. पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत अधिकारी श्री. प्रशांत मुकरे यांनी मंजुर घरकुल रक्कमेचा शेवटचा हप्ता देण्यासाठी तडजोडीवरून १२,०००/- रुपये लाचेची मागणी करून सदर रक्कम ग्रामपंचायत शिपाई श्री. दत्तात्रय अभिमान कांबळे यांचेकडे देण्यास सांगीतले. त्यानंतर करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान ग्रामपंचयत शिपाई श्री. दत्तात्रय अभिमान कांबळे यांनी तक्रारदार यांच्याकडून १२,०००/- रु लाचेची रक्कम स्वतः स्वीकारली. |

**सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक, एसीबी पुणे मो.क्र ९८२३१६७१५४, श्री. अजित पाटील, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी पुणे. मो.क्र ९०२९०३०५३०, श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रविंद्र लांभाते, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, श्री. शैलेश पवार, पोलीस निरीक्षक, एसीबी, सोलापूर, पोलीस अंमलदार संतोष नरोटे, गजानन किणगी, स्वामीराव जाधव, अक्षय श्रीराम सर्व नेमणुक एसीबी सोलापूर यांनी केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देणेसाठी कायदेशीर फी व्यतरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहन श्री. प्रशांत चौगुले, पोलीस उपअधीक्षक, एसीबी सोलापूर. मो.क्र. ९८२३२२५४६५ यांनी केले आहे.**

**संपर्क पत्ता- पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी महाराज रंगभवन चौक, सोलापूर.**
**संकेतस्थळ- www.acbmaharashtra.gov.in**
**ई मेल-www.acbwebmail@mahapolice.gov.in**
**ऑनलाईन तक्रार ॲप-acbmaharashtra.net**
**टोल फ्री क्रमांक- १०६४**
**दुरध्वनी क्रमांक- ०२१७-२३१२६६८**
**व्हॉटसअॅप क्रमांक-९४०४००१०६४**

16/3/26
(प्रशांत चौगुले)
सहा. पोलीस आयुक्त / पोलीसउप अधीक्षक
अँन्टीकरप्शन ब्युरो, सोलापूर

पोलीस उप अधिक्षक / पोलीस आयुक्त अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर
सत्यमेव जयते

Scanned with CamS